कार्यालय

किसन वीर महाविद्यालय, वाई

३१ जुलै २०२६

सूचना :

वरिष्ठ महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक आणि विद्यार्थ्यांना कळविण्यात येते की, आपल्या महाविद्यालयात मराठी विभाग, वाङ्मय मंडळ आणि स्टाफ वेल्फेअर समिती यांच्या संयुक्त विद्यमाने, शनिवार दि. १ ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी ९.०० वाजता, अण्णा भाऊ साठे यांची जयंती 'लेखन प्रेरणा दिन' म्हणून साजरी केली जाणार आहे. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे मा. डॉ. दत्तात्रय घोलप यांचे 'अण्णा भाऊ साठे व्यक्ती आणि वाङ्मय' या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे. तरी सर्वांनी वेळेत उपस्थित राहावे.

ठीकाण - खोली क्रमांक A·13

KISAN VEER MAHAVIDYALAYA
Wai, Dist. Satara

प्राचार्य

Scanned with OKEN Scanner

Janata Shikshan Sanstha's

Kisan Veer Mahavidyalaya, Wai

Tal. Wai, Dist. Satara, Maharashtra PIN-412 803.
Affiliated to Shivaji University, Kolhapur
NAAC Accredited : B++ (CGPA 2.94) 4th Cycle



Kisan Mahadeo Veer
Founder President
Janata Shikshan Sanstha, Wai

E-mail : wai161.cl@unishivaji.ac.in
prin.kvmwai@rediffmail.com
oskvmwai@rediffmail.com
oskvmwai@gmail.com

Website : www.kvmwai.edu.in
Ph. (Office) : 02167-299326

AISHE Code : C-10993
AICTE - DTE Code : 16189
UDISE No. : 27311111516
Index No. : J21.11.001

Dr. Gurunath Jotiba Fagare
Principal
Mob. 9421107635 / 9404140371

Shri. Shankarrao Dajiba Gadhave
Vice-President
Janata Shikshan Sanstha, Wai

Shri. Madan Prataprao Bhosale
President
Janata Shikshan Sanstha, Wai

Ref. No. : 86/389

Date : 31 JUL 2026

प्रति,

मा. डॉ. दत्तात्रय घोलप
संपादकीय सहायक
मराठी विश्वकोश निर्मिती कार्यालय,
वाई.

विषयः प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहण्याबाबत...

महोदय,

आमच्या महाविद्यालयात मराठी विभाग, वाङ्मय मंडळ आणि स्टाफ वेल्फेअर समिती यांच्या संयुक्त विद्यमाने, शनिवार दि. १ ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी ९.०० वाजता, अण्णा भाऊ साठे यांची जयंती 'लेखन प्रेरणा दिन' म्हणून साजरी केली जाणार आहे. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून आपण उपस्थित राहून, 'अण्णा भाऊ साठे व्यक्ती आणि वाङ्मय' या विषयावर मार्गदर्शन करावे, ही विनंती.

कळावे,

आपला विश्वासू ,

प्राचार्य

Scanned with OKEN Scanner

Janata Shikshan Sanstha's

Kisan Veer Mahavidyalaya, Wai

Tal. Wai, Dist. Satara, Maharashtra PIN-412 803.
Affiliated to Shivaji University, Kolhapur
NAAC Accredited : B** (CGPA 2.94) 4th Cycle



E-mail : wai161.cl@unishivaji.ac.in
prin.kvmwai@rediffmail.com
oskvmwai@rediffmail.com
oskvmwai@gmail.com

Website : www.kvmwai.edu.in
Ph. (Office) : 02167-299326

AISHE Code : C-10993
AICTE - DTE Code : 16189
UDISE No. : 27311111516
Index No. : J21.11.001

Kisan Mahadeo Ver
Founder President
Janata Shikshan Sanstha, W

Dr. Gurunath Jotiba Fagare
Principal
Mob. 9421107635 / 9404140371

Shri. Shankarrao Dajiba Gadhave
Vice-President
Janata Shikshan Sanstha, Wai

Shri. Madan Prataprao Bhosale
President
Janata Shikshan Sanstha, Wai

Ref. No. : 86/390.

Date : 01-08-2026

प्रति,

मा. डॉ. दत्तात्रय घोलप
संपादकीय सहायक
मराठी विश्वकोश निर्मिती कार्यालय,
वाई.

विषयः आभार पत्र...

महोदय,

आमच्या महाविद्यालयात मराठी विभाग, वाङ्मय मंड़ळ आणि स्टाफ वेल्फेअर समिती यांच्या संयुक्त विद्यमाने, शनिवार दि. १ ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी ९.०० वाजता, अण्णा भाऊ साठे यांची जयंती 'लेखन प्रेरणा दिन' म्हणून साजरी करण्यात आली . या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून आपण उपस्थित राहून, 'अण्णा भाऊ साठे व्यक्ती आणि वाङ्मय' या विषयावर मार्गदर्शन केले त्याबबद्ल महाविद्यालयाच्या वतीने आपले आभार.

कळावे,

आपला विश्वासू ,

प्राचार्य

Scanned with OKEN Scanner

जनता शिक्षण संस्थेचे

किसन वीर महाविद्यालय, वाई

मराठी विभाग, वाङ्मय मंडळ, स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र आणि स्टाफ वेल्फेअर समिती

यांच्या संयुक्त विद्यमाने, आयोजित

अण्णा भाऊ साठे जयंती (लेखन प्रेरणा दिन) निमित्त

विशेष व्याख्यान

शनिवार दि.१ ऑगस्ट २०२६ वेळ : सकाळी ०९ :००

उपस्थिती

अ.नं	नाव		सही
१	प्राचार्य डॉ. शुक्रनाथ फडतरे		
२	उपप्राचार्य प्रा.डॉ. विनोद वीर		
३	डॉ. दत्ता घोलप		
४	प्रा. रवींद्र घोडराज		
५	प्रा.डॉ. चंद्रकांत कांबळे		
६	डॉ. संग्राम शेरात		
७	डॉ. शिवाजी लाटे		
८	डॉ. धनंजय निंबाळकर		D.S. Nimbalkar
९	एकता खरात.	BA-I	
१०	सई पोळ.	BA-I	
११	तनिष्का गायकवाड.	BA-I	
१२	मैथिली हरिहर.	BA-I	
१३	आयुष महागडे	11th	
१४	प्रेरणा शेलार	11th	
१५	स्वार्थक कोळेकर	11th	S.P.K
१६	तन्मय यादव.	11th	
१७	राजेश चव्हाण	11th	
१८	रोहित महांगडे	BA II	
१९	अनिकेत यादव	B.A-I	

Scanned with OKEN Scanner

२०	तन्वी भानुदास महाडीक	11th	Tanvi
२१	अनुष्का दिपक जगताप	11th	
२२	प्रिया दिपक गाढवे	11th	
२३	आदिती महेश मोरे	11th	A.M.More.
२४	कार्तिक सुरेश पाटणे	11th	
२५	प्राची ज्ञानेश्वर गोले	11th	P.D.Gole
२६	हक्का गणेश सांडरे	11th	
२७	कांबळे प्रभव विनय		
२८	ढोबळे यश संभाजी		
२९	वायदंडे सुदर्शन शंकर		
३०	मयुरी मधुकर देशमुख	11th	M.M.Deshmukh
३१	रुतुजा महेश वडार	11th	R.M.Vadar.
३२	सिद्धी संतोष देशमुख	11th	S.Deshmukh
३३	प्रतिक्षा देवजी अनुसे	11th	
३४	राधिका विजय मोक्षर.	11th	
३५	जान्हवी गणेश मोसले	11th	Mosale,
३६	हेमांगी सागर शिंदे	11th	Hemangi
३७	तन्मई अरविंद सणस	B.A-I	T.A.sanas
३८	साक्षी संतोष केलगणे	BCA-I	Sakshi
३९	त्रिवेणी अनिल तरडे	BCA-I	Tarade
४०	नेहा मारुती सपोनिशी	BCA-1	N.M. sapanishi
४१	आरती उमेश जाधव	BCA-I	Jadhav
४२	साक्षी सचिन जायकर	BCA-I	Jaykar
४३	अमृता शंकर जाधव	BCA-I	Jadhe.
४४	Partth Dharmendra kayangude	BCA-I	Parthos
४५			
४६			
४७			
४८			
४९			

उपस्थिती - ८ मुली - २५
मुले - ११

Scanned with OKEN Scanner

अहवाल

अण्णा भाऊ यांचा जन्मदिन लेखन प्रेरणा दिन म्हणून साजरा

अण्णा भाऊ साठे यांनी साहित्याच्या सर्व प्रकारांमध्ये वास्तववादी लेखन केल्यामुळे ते चतुःरस्र लेखक होते, असे प्रतिपादन विश्वकोश निर्मिती कार्यालय, वाई येथील संपादकीय सहायक डॉ. दत्ता घोलप यांनी केले. येथील जनता शिक्षण संस्थेच्या किसन वीर महाविद्यालयामध्ये मराठी विभाग, वाङ्मय मंडळ, स्टाफ वेल्फेअर समिती व स्पर्धा परीक्षा विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने अण्णा भाऊ साठे यांची जयंती 'लेखन प्रेरणा दिन' म्हणून साजरी करण्यात आली, यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गुरुनाथ फगरे होते. याप्रसंगी उपप्राचार्य प्रा(डॉ.) विनोद वीर, विश्वकोश कार्यालयातील श्री. रवींद्र घोडराज, मराठी विभागप्रमुख प्रा. डॉ. चंद्रकांत कांबळे, वाङ्मय मंडळाचे समन्वयक डॉ. संग्राम थोरात स्टाफ वेल्फेअर समितीचे समन्वयक डॉ. शिवाजी ताटे, स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्राचे समन्वयक प्रा. राजेंद्र जायकर यांची प्रमुख उपस्थिती होती.

आपल्या व्याख्यानात डॉ. घोलप पुढे म्हणाले, लेखक हा समाजाचा आरसा असतो, अण्णा भाऊ साठे यांच्याकडे अनुभवांचे संचित असल्यामुळे त्यांनी आपल्या साहित्यातून समाजातील अनेक प्रकारच्या समस्या मांडल्या. सर्वसामान्यांचा प्रतिनिधी म्हणून लेखक साहित्यातून अनेक प्रश्नांची मांडणी करीत असतो. लेखकाने मांडलेल्या विश्वाचा अर्थ वाचकाला समजून घेता आला पाहिजे. लेखन करण्यासाठी भरपूर वाचन केले पाहिजे. नवलेखकाने आपल्या लेखनाची मांडणी स्वभाषेत केली पाहिजे. सामाजिक आशयांना केंद्रस्थानी ठेवून अण्णा भाऊ यांनी लेखन केले, त्यांच्या कथा ह्या जगण्यासाठी लढणाऱ्या माणसांच्या आहेत. शाहिरीच्या माध्यमातून त्यांनी प्रबोधनाबरोबरच राष्ट्रीय समस्याही मांडल्या. त्यांचे लेखन हे साचेबद्ध नव्हते.

अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना प्राचार्य डॉ. फगरे म्हणाले, अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्याचे महत्त्व आजच्या आधुनिक काळातही आहे. त्यांचे साहित्य हे अनुभूतीतून आले असल्यामुळे ते दीर्घकाळ टिकणारे आहे. लेखनाची प्रेरणा ही आपल्या विचारातून निर्माण होते. त्यांच्या साहित्याची भाषा ही चित्रदर्शी होती. माणसाला श्रेष्ठ मानण्याचे मूल्य त्यांच्या साहित्यातून दिसून येते. अण्णा भाऊ खऱ्या अर्थाने सामाजिक तत्वचिंतक होते.

कार्यक्रमाच्या सुरुवातीस अण्णा भाऊ साठे यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात प्रा. डॉ. चंद्रकांत कांबळे यांनी अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्याची ओळख करून दिली व 'लेखन प्रेरणा दिनाचे' महत्त्व सांगितले. पाहुण्यांची ओळख डॉ. संग्राम थोरात यांनी करून दिली. डॉ. धनंजय निंबाळकर यांनी आभार मानले, तर सूत्रसंचालन प्रा. धनश्री भोसले यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी डॉ. संदीप वाटेगावकर, डॉ. अमोल कवडे, प्रा. राहुल तायडे, श्री. विशाल महांगडे, श्री. शिवराज तलवारे, श्री. किशोर पिसाळ, श्री. श्रीधर पवार यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाला महाविद्यालयातील प्राध्यापक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

Scanned with OKEN Scanner

ऐक्य

अण्णा भाऊ साठे हे चतुरस्र लेखक होते : डॉ. घोलप

▲ **वाई,** दि. २ : अण्णा भाऊ साठे यांनी मराठी साहित्याच्या सर्व प्रकारांमध्ये वास्तववादी लेखन केले आहे. ते चतुरस्र लेखक होते, असे प्रतिपादन विश्वकोश निर्मिती कार्यालय, वाई येथील संपादकीय सहायक डॉ. दत्ता घोलप यांनी केले.

येथील जनता शिक्षण संस्थेच्या किसन वीर महाविद्यालयातील मराठी विभाग, वाङ्मय मंडळ, स्टाफ वेल्फेअर समिती व स्पर्धा परीक्षा विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने अण्णा भाऊ साठे यांची जयंती 'लेखन प्रेरणा दिन' म्हणून साजरी करण्यात आली. त्यावेळी ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गुरुनाथ फगरे होते. याप्रसंगी उपप्राचार्य प्रा.(डॉ.) विनोद वीर, विश्वकोश कार्यालयातील रवींद्र घोडराज, मराठी विभागप्रमुख प्रा. डॉ. चंद्रकांत कांबळे, वाङ्मय मंडळाचे समन्वयक डॉ. संग्राम थोरात, स्टाफ वेल्फेअर समितीचे समन्वयक डॉ. शिवाजी ताटे, स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्राचे समन्वयक राजेंद्र जायकर यांची प्रमुख उपस्थिती होती.



डॉ. दत्ता घोलप यांचा सत्कार करताना प्राचार्य डॉ. गुरुनाथ फगरे, शेजारी मान्यवर.

डॉ. घोलप म्हणाले, सामाजिक आशयांना केंद्रस्थानी ठेवून अण्णा भाऊ यांनी लेखन केले. त्यांच्या कथा जगण्यासाठी लढणाऱ्या माणसांच्या आहेत. शाहिरीच्या माध्यमातून त्यांनी प्रबोधनाबरोबरच राष्ट्रीय समस्याही मांडल्या. त्यांचे लेखन साचेबद्ध नव्हते.

अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना प्राचार्य डॉ. गुरुनाथ फगरे म्हणाले, अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्याचे महत्त्व आजच्या आधुनिक काळातही आहे. त्यांचे साहित्य हे अनुभूतीतून आले असल्यामुळे, ते दीर्घकाळ टिकणारे आहे. लेखनाची प्रेरणा ही आपल्या विचारातून निर्माण होते. त्यांच्या साहित्याची भाषा ही चित्रदर्शी होती. कार्यक्रमाच्या सुरुवातीस अण्णा भाऊ साठे यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात प्रा. डॉ. चंद्रकांत कांबळे यांनी अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्याची ओळख करून दिली व 'लेखन प्रेरणा दिनाचे' महत्त्व सांगितले. पाहुण्यांची ओळख डॉ. संग्राम थोरात यांनी करून दिली. डॉ. धनंजय निंबाळकर यांनी आभार मानले. श्रीमती धनश्री भोसले यांनी सूत्रसंचालन केले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी डॉ. संदीप वाटेगावकर, डॉ. अमोल कवडे, राहुल तायडे, पोलीस व सैन्य भरतीपूर्व प्रशिक्षणाचे प्रशिक्षक विशाल महांगडे, शारीरिक शिक्षक शिवराज तलवारे, किशोर पिसाळ, श्रीधर पवार यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाला महाविद्यालयातील प्राध्यापक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

Main Edition
Aug 03, 2026 Page No. 6
Powered by: erelego.com

Scanned with OKEN Scanner